दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
• मंगळवार
दि. १६ डिसेंबर २०२५

# हॉकी स्पर्धेत यशवंतराव चव्हाण कॉलेज प्रथम

**• विवेकानंद कॉलेजच्या वतीने आयोजन**

**जनप्रवास : कोल्हापूर**

विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांच्यावतीने मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम येथे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय पुरुष हॉकी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत प्रथम क्रमांक इस्लामपुरातील यशवंतराव चव्हाण कॉलेज, द्वितीय क्रमांक विवेकानंद कॉलेज, तृतीय क्रमांक कोपार्डेतील स. ब. खाडे कॉलेज, चतुर्थ क्रमांक गडहिंग्लजमधील डॉ. घाळी कॉलेज स्पर्धेमधून शिवाजी विद्यापीठाचा पुरुष हॉकी संघ निवडला आहे.

आंतरविभागीय पुरुष हॉकी स्पर्धेमध्ये सांगली, सातारा या जिल्ह्यामधील महाविद्यालयाचे संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते झाले. मुख्य पंच म्हणून




विवेकानंद कॉलेजमध्ये पुरूष हॉकी स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी पंचांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात.

नजीर मुल्ला, सहाय्यक पंच म्हणून सागर जाधव, योगेश देशपांडे, राहुल गावडे, श्वेता पाटील हे होते. सूत्रसंचालन डॉ. विकास जाधव यांनी केले. आभार प्राध्यापक समीर पठाण यांनी मानले. स्पर्धेचे संयोजन प्रा. संतोष कुंडले, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, एस. के. धनवडे, सुरेश चारपले यांनी केले. या स्पर्धेसाठी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. ई. बी. आळवेकर. डॉ. सी. बी. पाटील. कोल्हापूर जिल्हा हॉकी संघटना अध्यक्ष विजय साळोखे-सरदार, डॉ. विकास जाधव, स्पर्धा निरीक्षक डॉ. संतोष जाधव, निवड समितीचे सदस्य डॉ. रणजीत इंगवले, डॉ. एच. ए नारायणकर उपस्थित होते.

पुढारी कोल्हापूर मंगळवार, १६ डिसेंबर २०२५

# विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शिवशस्त्र शौर्य गाथा संग्रहालयास भेट

**कोल्हापूर :** विवेकानंद ज्युनिअर महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या ४० विद्यार्थ्यांनी कसबा बावडा येथील छत्रपती शाहू महाराज जन्मस्थळ येथे नुकतीच अभ्यास भेट दिली. लक्ष्मी विलास पॅलेस, कसबा बावडामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील वाघनख्यांची माहिती व इतर मराठा कालखंडातील शस्त्रांची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. संग्रहालयामध्ये तलवारी, कुऱ्हाडी, खंजीर तसेच पितळी व कातड्यापासून बनवलेल्या शस्त्रांची माहिती घेतली. यानंतर राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित माहितीपट विद्यार्थ्यांनी पाहिला. या क्षेत्रभेटीमध्ये ज्युनि.आर्टस्, कॉमर्स विभागप्रमुख प्रा. शिल्पा भोसले, प्रा. एस. एन. पाटील, प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. एस. पी. वेदांते, प्रा. एम. पी. गवळी सहभागी झाल्या होत्या.

तरुण भारत संवाद
मंगळवार, १६ डिसेंबर २०२५

# विवेकानंदच्या विद्यार्थ्यांची 'शिवशस्त्र'ला भेट

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विवेकानंद ज्युनिअर महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या अंतर्गत ४० विद्यार्थ्यांची कसबा बावडा येथील छत्रपती शाहू महाराज जन्मस्थळ येथे क्षेत्रभेट आयोजित केली होती. लक्ष्मी विलास पॅलेस, कसबा बावडा मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील वाघनख्यांची माहिती व इतर मराठा कालखंडातील शस्त्रांत्रांची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. तसेच या संग्रहालयामध्ये तलवारी, कुऱ्हाडी, खंजीर तसेच पितळी व कातड्यापासून बनवलेल्या शस्त्रांची माहिती घेतली.

यानंतर राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित माहितीपट विद्यार्थ्यांनी पाहिला. यामध्ये राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूरचा विकास, आधुनिक शेतीसाठी केलेले प्रयत्न, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी



**कोल्हापूर : शिवशस्त्र शौर्यगाथाला विवेकानंदच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. यावेळी उपस्थित विद्यार्थी आणि शिक्षक वृंद.**

केलेल्या सोयी याबाबत माहिती मिळाली. श्री महाराणी लक्ष्मीबाई साहेब तलाव राधानगरीची प्रतिकृती पाहिली. या क्षेत्रभेटीसाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य् कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे बहुमोल सहकार्य लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात व रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन मिळाले. या क्षेत्र भेटी मध्ये ज्युनि. आर्टस,